ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

# सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील मराठी विषयासाठी कृतीयुक्त शिक्षण पद्धतीनुरूप अध्यापनाच्या जाणीव जागृतीचा अभ्यास

** सुनिता मारुती जोगदनकर व ** डॉ. दत्ता वाघमारे*

** पीएच.डी. संशोधक, ** संशोधन मार्गदर्शक*

**प्रस्तावना:**

शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावर अध्ययन अध्यापन प्रक्रिया सतत बदलत असते. ही प्रक्रिया काळानुसार आहे. आणि ती बदलणे हे ही महत्वाचे आहे. या प्रक्रियेमधून विदयाथ्यांचे अध्ययन प्रभावी होणे आवश्यक आहे. शिक्षणातून बालकांचा विकास विविधांगांनी होत असतो. एकंदरीत बालकाच्या शिक्षणात भाषा शिक्षणास महत्वाचे स्थान आहे.

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात सर्वच क्षेत्रात प्रगतीचा स्फोट होत आहे. शिक्षणक्षेत्रात झपाटयाने वाढ होत आहे. शिक्षण पध्दतीत नवनवीन तंत्रे विकसित होत आहेत. नविन शैक्षणिक विकासाला एक नविन दृष्टि प्राप्त झाली आहे. शिक्षणाच्या झपाटयाने होणाऱ्या वाढीबरोबरच समस्यासुध्दा तितक्याच वेगाने वाढत आहेत. इंग्रजी माध्यमाच्या शाळामधून मराठी विषयाच्या अध्ययन अध्यापनात अनेक अडचणी दिसून येतात. प्रामुख्याने इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील शिक्षकांना मराठी भाषेचे महत्त्व लक्षात घ्यावे असे वाटत नाही. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठी विषयाला दुय्यम स्थान आहे. सोलापूर जिल्ह्यात अनेक मातृभाषा बोलणारे लोक राहतात. अमराठी भाषीक विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे अध्ययन करताना बहुतेक शब्द कळत नाही. तसेच अध्यापकांना आपले अध्यापन करताना, पाठ घेताना शब्दांचे अर्थ स्पष्ट करताना अनेक समस्या येतात. अश्या अनेक समस्या विद्यार्थी आणि शिक्षकांसमोर निर्माण होतात. मराठी विषयाची अध्ययन अध्यापन स्थिती सुधारण्यासाठी शिक्षकांनी प्रयोगशील असले पाहिजे. कृतीयुक्त शिक्षण पध्दतीनुरूप अध्यापन कार्यनीतीची जाणीवजागृती करण्यासाठी संशोधकाने संशोधनासाठी या विषयाची निवड केली आहे.

**Copyright © 2024 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

**कृतीयुक्त अध्ययन पध्दती संकल्पना:**

ABL म्हणजे Activity Based Learning म्हणजेच, कृतियुक्त अध्ययन पद्धती' ही एक कृतियुक्त अध्ययनाला प्रोत्साहन देणारी पद्धती आहे. डेव्हिड हॉर्सबर्ग या शिक्षण तज्ञाने 1994 मध्ये ही पद्धती विकसित केली. जे कृष्णमूर्ती या शिक्षण तज्ञांच्या विचारधारेवर चालणाऱ्या ऋषी व्ह. ली. स्कूलमध्ये कृती आधारित अध्ययन पद्धती Activity Based Learning (ABL)

ही पद्धती प्रथम अंगिकारली गेली.

**कृतीयुक्त अध्ययन पद्धती म्हणजे काय ?**

ABL ही एक प्रभावी व परिणामकारक अशी अध्ययन पध्दती आहे. पारंपारिक अध्ययन पध्दती पेक्षी ही वेगळी असून विद्यार्थी हा केंद्रबिंदू असतो. तो प्रत्यक्ष कृतीतून शिकतो. त्यामुळे केलेले अध्ययन हे प्रभावी व चिरकाल टिकणारे असते. या पद्धतीत शिक्षकाची भूमिका ही मार्गदर्शकाची असते.

**कृतीयुक्त अध्ययन पद्धतीचे फायदे:**

1. विद्यार्थी गतीने शिकतात.
2. विद्यार्थी दिवशी विद्यार्थी अनुपस्थित असला तरीही, तो परंत आल्यानंतर तो ज्या ठिकाणाहून गेला होता तिथून पुढे जाऊ शकतोः
3. प्रत्येक विद्यार्थी प्रत्येक उपक्रमात पूर्णपणे भाग घेऊ शकतो.
4. स्वयं - शिक्षण, गट शिक्षण आणि परस्पर शिक्षणासाठी प्रोत्साहीत केले जाते.
5. विदयार्थ्यांना स्वतःहून शिकण्याचा अनुभव निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले जाते.
6. विदयार्थी आपपासात चर्चेच्या माध्यमातून संवाद कौशल्य विकसित करतात

**कृतीयुक्त अध्ययन पद्धती कार्यपध्दतीचे टप्पे:**

अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तके यांची एका विशिष्ट पध्दतीने सांगड घालून ABL पध्दतीमध्ये आवश्यक असणारे साहित्य विकसित करण्यात आले आहे. या प्रक्रियेतील टप्पे पुढीलप्रमाणे

टप्पा 1 प्रथम संपूर्ण अभ्यासक्रम (पाठ्यपुस्तकातील घटक हे माध्यम) घटक, उपघटक व पाठ्यमुद्यात / संकल्पनामध्येविभागणे, पाठ्य मुद्दा / संकल्पना स्पष्ट करण्यासाठी कृती निवडणे,

टप्पा 2 - प्रत्येक कृतीसाठी साहित्य तयार करणे. कोणती कृती करायची ते वर्णन करणारे कार्ड तयार करणे. ते कार्ड ओळखण्यासाठी चित्रांचा वापर केला आहे. त्यांना Logo (लोगो) असे म्हटले आहे.

टप्पा 3 - कृती / कार्ड यांचो क्रमबद्ध मांडणी म्हणजे एक घटक पूर्ण होणारा टप्पा. त्याचे नाव Milestone (माईलस्टोन), प्रत्येक विषयात असे 10 ते 15 टप्पे Milestones करण्यात आले आहेत.

टप्पा 4 - Milestone ची क्रमबद्ध मांडणी म्हणजे अध्ययन शिडी Ladder

टप्पा 5 - गटात / सामुहिकरित्या घ्यावयाच्या कृतीच्या मांडणीसाठी पूरक अध्ययन शिडी (Side Ladder) विकसित करणे. या कृतीसुध्दा Logo ने दर्शविल्या आहेत.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II

MARCH – APRIL 2024

Original Research Article

**संशोधनाची गरज व महत्व:**

**संशोधनाची गरज:**

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात सर्वच क्षेत्रात प्रगतीचा स्फोट होत आहे. शिक्षणक्षेत्रात झपाटयाने वाढ होत आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळामधून मराठी विषयाच्या अध्ययन अध्यापनात अनेक अडचणी दिसून येतात. प्रामुख्याने इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील अध्यापकांना मराठी भाषेचे महत्त्व लक्षात घ्यावे असे वाटत नाही. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठी विषयाला दुय्यम स्थान आहे. सोलापूर जिल्ह्यात अनेक मातृभाषा बोलणारे लोक राहतात. अमराठी भाषीक विद्याथ्यांना मराठी भाषेचे अध्ययन करताना बहुतेक शब्द कळत नाही. तासेच अध्यापकांना आपले अध्यापन करताना, पाठ घेताना शब्दांचे अर्थ स्पष्ठ करताना अनेक समस्या येतात. अश्या अनेक समस्या विद्यार्थी आणि शिक्षकांसमोर निर्माण होतात. मराठी विषयाची अध्ययन अध्यापन स्थिती सुधारण्यासाठी शिक्षकांनी प्रयोगशील असले पाहिजे. कृतीयुक्त शिक्षण पध्दतीनुरूप अध्यापन कार्यनीतीचे जाणीवजागृत्ती करण्यासाठी संशोधकाने संशोधनासाठी या विषयाची निवड केली आहे.

**संशोधनाची महत्व:**

- प्रस्तुत लघु संशोधनामुळे प्राथमिक स्तरावरील शिक्षकांना कृतीयुक्त शिक्षण पध्दतीतील आवश्यक बाबी समजतील
- प्रस्तुत संशोधनामुळे प्राथमिक स्तरावर मराठी विषय अध्ययन अध्यापनाची सद्यस्थिती समजेल.
- प्रस्तुत संशोधनामुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील प्राथमिक स्तरावर मराठी विषय अध्ययन अध्यापनाची सद्यस्थिती समजेल.
- प्रस्तुत संशोधनामुळे इंग्रजी माध्यमाच्या विद्याथ्यर्थ्यांस व शिक्षकांना त्यांच्या मराठी विषय अध्ययन अध्यापनामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे ठरणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. सोलापूर जिल्ह्यातील इंग्रजी माध्यम आणि शाळेतील प्राथमिक शाळेतील मराठी अध्ययन अध्यापनाच्या सद्यस्थिती जाणून घेणे
2. सोलापूर जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील प्राथमिक स्तरातील मराठी अध्ययनात विद्याथ्यांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे
3. सोलापूर जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील प्राथमिक स्तरातील मराठी अध्यापनात शिक्षकांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

4. सोलापूर जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील प्राथमिक स्तरातील मराठी विषयासाठी कृतीयुक्त शिक्षण पद्धतीनुरूप अध्यापनाचा आणि जाणीव-जागृतीचा अभ्यास करणे व अंमलबजावणीसाठी उपाययोजना सुचवणे.

**संशोधनाची व्याप्ती:**

1. प्रस्तुत संशोधनात सोलापूर जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक स्तराच्या विद्यार्थ्यांचा विचार करण्यात येणार आहे.
2. प्रस्तुत संशोधनात सोलापूर जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांच्या मराठी विषयाचा विचार करण्यात येणार आहे.

**संशोधनाची मर्यादा:**

1. प्रस्तुत संशोधनात सोलापूर जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त इ माध्यमाच्या शाळेचा विचार करण्यात येणार नाही.
2. प्रस्तुत संशोधनात सोलापूर जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक स्तरा व्यतिरिक्त इतर स्तरांचा विचार करण्यात येणार नाही.
3. प्रस्तुत संशोधनात सोलापूर जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे.

**संशोधन साधने:**

1. सोलापूर जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमातील प्राथमिक स्तरातील मराठी अध्यापन कार्य करणारे शिक्षकांना प्रश्नावली
2. सोलापूर जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमातील प्राथमिक स्तरातील मराठी अध्ययन करणारे विद्यार्थ्यांची गट मुलाखत

**संशोधन कार्यपद्धती:**

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी आवश्यक असणारी माहिती प्राप्त करण्यासाठी संशोधकांनी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक स्तरातील इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील असंभाव्यतेर आधारित सहेतुक नमुना निवड पद्धतीने सोलापूर जिल्ह्यातील एकूण तालुक्यांपैकी सहा तालुक्यातील शाळांची निवड सहेतुक व प्रसंगीक नमुना निवड पद्धतीने केली.

**निष्कर्ष :**

**शिक्षक प्रश्नावली:**

1. 60टक्के शिक्षकांच्या मतानुसार मराठी विषयाचे अध्यापन करणारे शिक्षक मराठी विषयातील पदवीधर नाहीत.
2. 40 टक्के शिक्षकांच्या मतानुसार मराठी विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना काव्यसंदर्भाचे स्पष्टीकरण करताना

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

अडचणी येतात,

3. 40 टक्के शिक्षकांच्या मतानुसार अध्यापन करताना चित्रपाठाचा भाग स्पष्ट करताना अडचणी येतात.
4. शाळेत मराठी भाषा वर्गखोली आहे असे मत मांडणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण 20 टक्के आहे.
5. शैक्षणिक साहित्याचा वापर अध्यापनात केला जातो असे 80 टक्के शिक्षक सांगतात. ही बाब चांगली आहे.
6. शाळेत मराठी विषयाचे भाषिक उपक्रम घेतले जाते असे 20 टक्के शिक्षक सांगतात.
7. भाषिक उपक्रमातून विद्यार्थ्यांची संवाद संप्रेषण कौशल्य विकसित होतात असे 60 टक्के शिक्षकांचे मत आहे.
8. भाषिक उपक्रमातून विद्यार्थ्यांची सर्जनशीलता विकास होते असे 40 टक्के शिक्षक सांगतात.
9. 80 टक्के शिक्षकांच्या मतानुसार मराठी भाषा अध्यापनात दृकश्राव्य साधने वापरतात.
10. इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांच्या लेखनात चुका होतात असे 60 टक्के शिक्षक सांगतात.
11. वाचनातील उच्चार स्पष्टपणे करताना अडचणी येतात असे 40 टक्के शिक्षक सांगतात,
12. 20 टक्के शिक्षकांच्या मतानुसार मराठी अध्यापन कार्य करणाऱ्या शिक्षकांना कृतीयुक्त शिक्षण पध्दती विषयी माहिती आहे.
13. माध्यमातील विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे अध्ययन करताना मातृ भाषेतील विविधतेमुळे समस्या निर्माण होतात असे 70 टक्के शिक्षक सांगतात.
14. इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे अध्ययन करताना शाळेमध्ये इंग्रजी प्राधान्य असल्यामुळे अध्ययनात अडचणी येतात असे 30 टक्के शिक्षक सांगतात.

**विद्यार्थी गट मुलाखत:**

1. इंग्रजी माध्यमांच्या शाळेत मराठी विषय शिकला जातो असे 100 टक्के विद्यार्थी सांगतात, हि बाब चांगली आहे
2. 60टक्के विद्यार्थ्यांच्या मतानुसार मराठी विषय शिकवण्यासाठी वेगळे स्वतंत्र शिक्षक शिक्षक असतात.
3. विद्यार्थ्यांना मराठी पुस्तकातील काव्य घटक आवडतो असे 80 टक्के विद्यार्थी सांगतात.
4. विद्यार्थ्यांस चित्रपाठ आवडतो असे 80 टक्के विद्यार्थी सांगतात.
5. मराठी भाषा वर्गखोली आहे असे 20 टक्के विद्यार्थी सांगतात.
6. मराठी भाषा अध्यापनात शैक्षणिक साहित्य शिक्षक वापरतात असे 90 टक्के विद्यार्थी सांगतात. हि वाव चांगली आहे.
7. मराठी विषयाचे उपक्रम घेतले जाते असे 60 टक्के विद्यार्थी सांगतात.
8. मराठी विषयाची परीक्षा घेतली जाते असे 100 टक्के विद्यार्थी सांगतात. ही बाब चांगली आहे.

9. मराठी विषयासाठी स्पर्धांचे आयोजन केले जाते. असे 60% विद्यार्थी सांगतात.

**उपाययोजना:**

1. मराठी विषय अध्यापन करण्यासाठी मराठी विषयाचे पदवीधरांची नेमणूक करावी.
2. शाळेत भाषा विषय खोली उपलब्ध करावे यातून शैक्षणिक साहित्य निर्मितीतून अध्यापन करताना अडचणी येणार नाही.
3. विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकसित करण्यासाठी स्पर्धा, विविध उपक्रम आयोजित केले जावे,
4. इंग्रजी माध्यम शाळेत इंग्रजी भाषेप्रमाणे मराठी भाषेला प्राधान्य द्यावे.
5. अध्यापन प्रभावी होण्यासाठी नवनवीन उपक्रम राबवावे तसेच संशोधनाचा अभ्यास शिक्षकांनी करावा. व त्याची अंमलबजावणी करावी.
6. कृतीयुक्त शिक्षण पद्धतीचा अभ्यास करावा व त्यांची अंमलबजावणी मराठी सोबत इतर विषयांसाठी उपयुक्त ठरते.

**संदर्भसूची:**


1. *डॉ.ह.ना जगताप, प्रा. तुषार साळुंखे, डॉ. नागनाथ येवले. (2017) 'शिक्षणातील नवीन विचारप्रवाह' सुविचार प्रकाशन मंडळ पुणे,*
2. *कुंडले म.वा. (1985) 'मराठीचे अध्यापन' श्रीविद्या प्रकाशन पुणे,*
3. *भिंताडे वि.रा. (2006) 'शैक्षणिक संशोधन पदती' नित्यनुतन प्रकाशन पुणे,*


**वेबसूची:**


*https://en.m.wikipedia.org/wiki/Activity-based learning in India*

*https://www.pdshinde.in/p/blog-page 99.html?m=3#google vignette*



*Cite This Article:*

**जोगदनकर सु. मा. व डॉ. वाघमारे द. (2024).** *सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील मराठी विषयासाठी कृतीयुक्त शिक्षण पद्धतीनुरूप अध्यापनाच्या जाणीव जागृतीचा अभ्यास.* In Educreator Research Journal: Vol. XI (Number II, pp. 296–301). **ERJ.** https://doi.org/10.5281/zenodo.10911903